शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

Use of Aadhar as identifier for all centrally funded scholarship schemes बाबतचे मा.सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन, मध्यवर्ती इमारत, पुणे यांचे क्र.उशिसं/शिष्यवृत्ती/२०१६/१४ अई/११०७६, दि.२७ सप्टेंबर,२०१६ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच सदरबाबतचा अहवाल सहसंचालक,उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांना सादर करावा.

कळावे,

आदेशान्वये,
14/10/16
I/C उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 146
दि. 17 OCT 2016

महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११९५३

क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/२०१६/१४ अई/ ११०७८ दिनांक : 27 SEP 2016

प्रति,

१) सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
पुणे,मुंबई, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, नागपूर, अमरावती,पनवेल,कोल्हापूर,सोलापूर.

Shivaji University, Kolhapur
Affiliation/T-2
Inward No. 4522
Date 28/09/16

२) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

**विषय : Use of Aadhar as identifier for all centrally funded scholarship schemes.**

संदर्भ : शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०१३/प्र.क्र.११५/मशि-२ दिनांक २१.९.२०१६.

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्र शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थ्यांना आधार कार्डचा वापर अभिज्ञापक (**identifier**) म्हणून होणार आहे. त्यासाठी संबंधित शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे. तसेच शिष्यवृत्तीच्या वितरणासाठी संबंधित विद्यार्थ्याचा आधार क्रमांक त्याच्या बँक खात्याशी संलग्न असणे आवश्यक आहे.

याबाबत यापूर्वी वेळोवेळी आपणास सूचना दिलेल्या आहेत. तसेच केंद्रशासनाकडून संबंधित शिष्यवृत्ती योजनांसाठी प्राप्त झालेल्या सूचना देखिल वेळोवेळी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील सर्व महाविद्यालयातील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाबाबतचा दर आठवडयाचा प्रगती अहवाल केंद्रास सादर करावयाचा आहे. त्यासाठी आपल्या स्तरावरुन आपल्या अखत्यारीतील शासकीय/अशासकीय, अनुदानित/ कायमविनाअनुदानित महाविद्यालये/संस्थांमधील विद्यार्थ्यांनी आधार कार्ड काढून ते त्यांच्या बँक खात्याशी संलग्न करणेबाबत सर्व महाविद्यालयांना बैठका घेऊन तसेच परिपत्रकाव्दारे सूचित करावे.

महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढून घेण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांशी संपर्क साधून महाविद्यालयांमध्ये कँप आयोजित करण्यासाठी गांभिर्याने प्रयत्न करावेत. सहसंचालक कार्यालयांनी तसेच विद्यापीठांनी महाविद्यालयांना यासाठी सहकार्य करावे.

ज्या विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढलेले आहेत त्यांनी त्यांचे आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न करुन घेण्यासाठीच्या सूचना महाविद्यालयांनी त्यांच्या सूचना फलकावर लावाव्यात.

विद्यार्थ्यांनी आधार कार्ड च्या संदर्भात कुठल्याही माहितीसाठी **www.uidai.gov.in** या संकेतस्थळास भेट द्यावी. सदर संकेतस्थळावर विद्यार्थी त्यांच्या भागाच्या नजिक असलेले आधार नोंदणी केंद्र शोधू शकतात.किंवा ऑनलाईन पध्दतीने आधार नोंदणी करु शकतात. आधार कार्ड बाबतची वैयक्तिक नोंदणी नंतरची स्थिती जाणून घेऊ शकतात. ऑन लाईन आधार कार्ड मिळण्यासाठी सदर संकेतस्थळ उपयुक्त आहे. तसेच विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीवरुन * ९९* ९९# वापरुन आधार क्रमांक कोणत्या बँक खात्याशी लिंक आहे हे कळू शकेल. त्यामुळे महाविद्यालयांनी याबाबतच्या सूचना विद्यार्थ्यांना द्याव्यात असे महाविद्यालयांना कळविण्यात यावे.

त्यामुळे याबाबत आपल्या विभागातील सर्व महाविद्यालयातील प्रचार्यांना सूचना देऊन त्यांच्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी आधार कार्ड कांढावे व ते मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची कार्यवाही व उपाययोजना करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(डॉ.वि.रा.मोरे)
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत - मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.